**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – तन्मय तुषार बांदेकर , वय – २२ वर्षे,

व्यवसाय – शिक्षण

रा. – देवगड, आनंदवाडी, ता.देवगड

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे प्र. सहा.सरकारी अभियोक्ता श्री.ए.ए.गुमास्ते यांचे मार्फत.</u>**

०१. दि.०८/०७/२०२३ रोजी सकाळी ६.०० च्या पुर्वी मी घरी झोपलो होतो. माझा भाऊ गोव्याला जाणार होता त्यामुळे त्याला देवगड एस.टी स्टॅण्डवर सोडण्यासाठी जाणार होतो. मला त्यासाठी आईने उठवले. गाडी ६.०० वा. ची होती. मी व माझा भाऊ आमची ज्युपिटर दुचाकी गाडीने निघालो. गाडी आईच्या नावावर आहे. त्यानंतर आम्ही डेपोत आलो. देवगड–पणजी गाडी डेपोतून निघून पुढे गेली होती. भाऊ म्हणाला की, गाडीच्या मागून जाऊया मला गाडीवरुन सोड. त्याप्रमाणे आम्ही गाडीच्या पाठीमागे गेलो. दिर्बादेवी स्टॉप येथे एस.टी.थांबली होती. आमची गाडी एस.टी.च्या थांबवली. आमची गाडी माझा भाऊ चालवत होता व मी मागे बसलो होतो. मागून देवगड–वानिवडे एस.टी आली. त्या एस.टी. ने आम्हाला पाठीमागून जोरात ठोकर दिली. त्यामुळे आम्ही दोघेही गाडी बरोबर उडून शेजारच्या दुकानाच्या शेडमध्ये जाऊन पडलो. एस.टीने पाठीमागून येऊन शेडला ठोकरले. त्यामुळे शेडचे पत्रे व लोखंडी रॉड आमच्या अंगावर पडले. त्यामुळे माझ्या डोक्याला, हातापायांना असा पुर्ण शरिराला मार लागला होता. माझ्या भावाच्या डोक्यावर लोखंडी रॉड जोरात पडला होता. त्यामुळे त्याला अंतर्गत जखम झाली होती. तेथे लोक जमले होते. तेथे मला माझ्या ओळखीचा तेजस मामघाडी हा दिसला, मी त्याला हाक मारली. त्याने आम्हाला ओळखले व आम्हाला ॲम्ब्युलन्समधून सरकारी दवाखाना देवगड येथे नेले. तेथे माझ्यावर थोडे उपचार केले. भाऊ सिरीयस असल्याने त्याला कोल्हापुर येथील वीन्स हॉस्पिटल येथे पाठवले. आम्हाला दोघांनाही वीन्स हॉस्पिटल येथे उपचारासाठी पाठवले होते. वीन्स हॉस्पिटल मध्ये पोलीस आले होते. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता. हॉस्पिटलमधून सोडल्यानंतर पुन्हा पोलीस घरी आले होते. तेथे पुन्हा पोलिसांनी माझा जबाब घेतला होता. मला डिस्चार्ज देत असताना मला कळाले की, माझा भाऊ घटनेच्याच रात्री वीन्स हॉस्पिटल येथे मयत झाला होता. घटनेबाबत माझे काका तुकाराम यांनी तक्रार दिली होती.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास विनंती अर्जावरुन तहकूब...**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
(श्रीमती एन.बी.घाटगे)
दि. ०९/०५/२०२५
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड